सेशन केस नं. ७०/२०२३
निशाण नं. २९ /क

**अभियोगपक्षा तर्फे साक्षीदार क्र. २ यांची साक्ष शपथेवरुन सुरु**

माझे नाव - राजाराम आनंदा कोतेकर

व.व. ५२ वर्षे व्यवसाय- शेती

रा. कोते ता. राधानगरी जि. कोल्हापूर

**अभियोगपक्षा तर्फे सरतपास वकिल श्रीमती एम.बी. पाटील , यांचेमार्फत सुरु**

दिनांक २०.०४.२२ रोजी पोलिस श्री पारखे यांनी मला सुधाकर पाटिल यांच्या घरी औषध खालेल्या ठिकाणाचा पंचनामा करण्यााठी बोलावले. अन्य पंच राजाराम दौलत पाटिल हे हजर होते. सुधाकर पाटिल यांनी कोते येथील त्यांच्या घरातील जागा दाखवली. घर उत्तराभि मुखी व आर सी सी बांधकामातील आहे. त्या घरात हॉल, किचन व एक बेडरुम असे आहे. प्रत्यक्ष घटनास्थळ बेडरुम मध्ये होते. तेथे आम्हांला ग्रामोझोनची एक बाटली व एक वाटी दिसली. बाटली पांढ-या रंगाची प्लॅस्टीकची होती. पोलिसांनी ति बाटली पंचनामा करुन ताब्यात घेतली. तो पंचनामा आमच्या समक्ष करुन त्यावर पोलिसांनी आमच्या सहया घेतल्या. घटनास्थळ पंचनामा मला दाखवला. त्यावर अ.क्र. १ वर माझी सही असुन त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि. ३०** देण्यात आले. ग्रामोझोन प्लॅस्टीकची बाटली दाखवली तर मी ओळखु शकतो.

**नि. ३१ वरील आदेशान्वये उलटतपास तहकुब**

RAJSHRI VIJAY ADONE
Digitally signed by RAJSHRI VIJAY ADONE
Date: 2026.08.07 11:30:16 +0530

दिनांक – २४/०७/२०२६

( श्रीमती आर. व्ही. आदोने )
अतिरिक्त सत्र न्यायाधीश ,
कोल्हापूर

**शपथेवर आरोपी  तर्फे उलटतपास वकिल श्री एस. एस. अंगज**

२.		फिर्यादी सुधाकर पाटील हे माझ्या गावचे असल्यामुळे मी त्यांना ओळखतो.  पोलिस श्री पारखे यांनी मला पंचनाम्या करीता बोलावले.  घटने नंतर एक महिन्याने पोलिस पंचनाम्या करीता घटनास्थळी आले.  दुसरे पंच राजाराम दैलत पाटील हे होते.  ते कोते येथील राहणारे आहेत.  पोलिसांनी आम्हांला घटनास्थळ पंचनामा करायचा आहे असे सांगीतले होते.  घटनास्थळ पंचनाम्यावेळी शेजारी - पाजारी राहणारे  लोक आलेले नव्हते.  फिर्यादी सुधाकर म्हणजेच वैष्णवीच्या वडिलांनी घटनास्थळ दाखवले.  पंचनामा मी वाचुन पाहिलेला होता.  त्या पंचनाम्यात अकस्मीत मयत रजि. नं. ३२/२०२२ सी.आर.पी. कलम १७४ असे नमुद आहे. पंचनाम्या करीता किती पोलिस आले व किती वाजता आले हे मला सांगता येणार नाही.  असे घडले नाही की, आम्हांला पोलिस स्टेशनला बोलावले व पोलिस स्टेशन मध्ये आमच्या सहया घेतल्या.  पारखे पोलिस यांनी पंचनामा लिहिला.  हे म्हणणे खरे नाही की, आमच्या समक्ष पोलिसांनी फिर्यादी यांच्या घराचा पंचनामा केला, बेडरुम मधील ग्रामोझोनची बाटली जप्त केली असे सर्व खोटे सांगत आहे.  हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी अगोदरच पंचनामा लिहुन आणलेला होता.  जप्त केलेल्या बाटलीवर पोलिसांनी आमच्या सहया घेतल्या नाहीत.  हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी माझे गावातील असल्याने त्यांना मदत करण्या करीता खोटी साक्ष देत आहे, पंचनामा माझ्या समक्ष केला नाही.

उलटतपास पुर्ण

फेरतपास नाही

श्रणोत्तरी स्वीकृती

RAJSHRI VIJAY ADONE
Digitally signed by RAJSHRI VIJAY ADONE
Date: 2026.08.07 11:30:28 +0530

दिनांक – ०६/०८/२०२६

( श्रीमती आर.  व्ही. आदोने  )
अतिरिक्त सत्र न्यायाधीश ,
कोल्हापूर